महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, संचालक
संवर्गातील अधिकारी यांच्या
प्रशासकीय बदल्या करणेबाबत.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
08 JUL 2025
प्राप्त झाले सही....................

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
शासन आदेश :-संलेको-२०२५/प्र.क्र.४३/कोषा प्रशा-२
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :-७ .७.२०२५.

## शासन आदेश

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, संचालक संवर्गातील (एस-२९ रुपये १,३१,१००-२,१६,६००/-) खालील विवरणपत्रात नमुद अधिकाऱ्यांच्या महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील नियम ४ (४) व ४ (५) नुसार खालील विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ मध्ये नमूद पदावर प्रशासकीय बदल्या करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव, पदनाम व कार्यालय | प्रशासकीय बदलीचे पद व कार्यालय |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| १ | श्री.लक्ष्मण माधवराव पाटील, मुख्य लेखापरीक्षक, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, ठाणे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर |
| २ | श्री.बाळासाहेब बाबुराव थिटे, संचालक (वित्त), महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मीती कंपनी मर्यादित (महानिर्मिती), मुंबई | वित्तीय सल्लागार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई |
| ३ | श्री.सुरेश दादासाहेब सारंगकर, वित्तीय नियंत्रक, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई | वित्त व लेखा अधिकारी, कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मुंबई |
| ४ | श्री.अंकुश रामा नवले, वित्तीय सल्लागार, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई | वित्तीय सल्लागार, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको), नवी मुंबई |

२. वरीलप्रमाणे बदली झालेल्या अधिका-यांच्या नियंत्रक अधिकाऱ्यांनी बदली अधिका-याची प्रतिक्षा न करता स्थानिक व्यवस्था करुन संबंधित अधिकाऱ्यांस तात्काळ कार्यमुक्त करावे.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या विहित कालावधीत संबंधित अधिकारी यांनी पदस्थापनेच्या पदावर रुजू होण्याची दक्षता घ्यावी. पदस्थापनेच्या पदावर रुजू न झाल्यास

महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. संबंधित अधिकाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी हजर होताच शासनास तसेच संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांना अवगत करावे.

५. वरील अधिकाऱ्यांनी त्यांच्या नवीन पदाचा कार्यभार स्विकारताच त्यांच्या वैयक्तीक माहितीचा तपशिल HRMS मधील नमून्यात भरुन नवीन कार्यालय प्रमुखांमार्फत वित्त विभाग तसेच संचालनालय, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई या कार्यालयास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव महाराष्ट्र शासन,**

प्रत,

१. महालेखापाल -१/२ (लेखा व अनुज्ञयेता /लेखा परीक्षा) महाराष्ट्र मुंबई/नागपूर *
२. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. सचिव (ले. व को.), यांचे स्वीय सहाय्यक, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
४. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.*
६. संबंधित अधिका-याचे सध्याचे कार्यालय प्रमुख.*
७. संबंधित अधिका-याचे बदली झालेल्या कार्यालयाचे प्रमुख.*
८. संबंधित अधिकारी*
९. निवड नस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

(* संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)